**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान
- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातला उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस /बिहारमधे उद्या मुदत संपणार
- यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मतदानाचे प्रमाण ७५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचं निवडणूक आयोगाचं उद्दिष्ट
- जेम अर्थात सरकारी ई मार्केटमध्ये चालू आर्थिक वर्षात ४ लाख कोटी रुपयांची विक्रमी खरेदी
- स्पेन मास्टर्स खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या मिश्र दुहेरीत भारताची एन सिक्की रेड्डी आणि बी सुमीत रेड्डी ही जोडी उपांत्यफेरीत दाखल

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनौ सुपर जायंट संघाची, पंजाब किंग्ज् संघाशी लढत

**<><><><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान केले. माजी प्रधानमंत्री पी व्ही नरसिंह राव, चौधरी चरण सिंह, कृषी शास्त्रज्ञ एम एस स्वामिनाथन आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांना मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्यात आले. पी व्ही नरसिंह राव यांचे चिरंजीव पीव्ही प्रभाकर राव, एमएस स्वामीनाथन यांच्या कन्या

नित्या राव, चौधरी चरण सिंग यांचे नातू जयंत सिंग, कर्पूरी ठाकूर यांचे चिरंजीव रामनाथ ठाकूर यांनी पुरस्कार स्वीकारला. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि इतर मान्यवर या समारंभाला उपस्थित होते. माजी उपप्रधानमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांना राष्ट्रपती उद्या पुरस्कार प्रदान करतील.

<><><><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातला उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. १७ राज्य आणि ४ केंद्रशासित प्रदेशांमधे मिळून लोकसभेच्या १०२ जागांसाठी १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. तामिळनाडू, अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्कीम, लक्षद्वीप, अंदमान आणि निकोबार बेटे तसंच पुद्दुचेरी इथं या एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. बिहारमधे होळी आणि बिहार स्थापना दिनानिमित्त सुट्टी असल्यानं अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख उद्या आहे.

महाराष्ट्रातल्या नागपूर, भंडारा - गोंदिया, गडचिरोली - चिमूर, चंद्रपूर आणि रामटेक या मतदारसंघांचा समावेश आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आज संपल्यावर सर्व ठिकाणच्या लढतींचं चित्र स्पष्ट होईल. महाराष्ट्रात प्रामुख्याने भाजपा विरुद्ध काँग्रेस अशीच लढत या टप्प्यात होणार आहे.

सिक्कीम आणि अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी देखील अर्ज मागे दाखल करण्याचा अंतिम दिवस आज आहे. सिक्कीममधल्या ३२ विधानसभा मतदारसंघ आणि अरुणाचल प्रदेशातल्या ६० विधानसभा मतदारसंघांसाठी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे.

**<><><><><><><>**

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मतदानाचे प्रमाण ७५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट निवडणूक आयोगानं ठेवलं आहे. त्यासाठी थेट मतदान केंद्रांवर पातळीवर जाऊन आढावा घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी आकाशवाणीला दिली आहे.

**होल्ड - बाइट**

श्रोते हो, ही पूर्ण मुलाखत आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर दोन भागात आज आणि उद्या संध्याकाळी सव्वा ७ वाजता वृत्तविशेष या कार्यक्रमात आपल्याला ही मुलाखत ऐकता येईल. यामध्ये निवडणूक यंत्रणा कशारितीने कार्यरत आहे, मतदारांसाठी कोणकोणत्या सुविधा उपलब्ध आहेत, उमेदवारांनी काय करावे, काय करू नये यासारख्या मुद्द्यांवर त्यांनी माहिती दिली आहे. आकाशवाणीच्या समाज माध्यम खात्यांवर, Mumbai AIR News युट्युब चॅनेलवर आणि आकाशवाणी मराठी बातम्या या पॉडकास्टवरही ही मुलाखत आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><><><>**

श्रोते हो, लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी राज्यात सुरू झाली आहे. काही जागांवर उमेदवार जाहीर झाले आहेत काही ठिकाणी होणार आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या जागावाटपाचं चित्र अजूनही स्पष्ट झालेलं नाही. अर्ज कधी भरायचे, मतदान कधी करायचं, निकाल कधी होणार हे मात्र स्पष्ट आहे. त्यामुळं राज्यातल्या लोकसभा मतदार संघातली परिस्थिती कशी आहे, कुठून कोण निवडणूक रिंगणात उतरलंय, निवडणूक लढवण्याविषयी उमेदवारांची भूमिका काय, राजकीय विश्लेषकांचं काय मत आहे, स्थानिकांच्या अपेक्षा काय याचं विश्लेषण करणारा कार्यक्रम ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ आकाशवाणी आपल्यासाठी घेऊन येत

आहे सोमवार १ एप्रिलपासून. संध्याकाळी सव्वा ७ ते साडे ७ वाजेदरम्यान आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. आकाशवाणी मराठी बातम्या हे पॉडकास्ट चॅनेलसह आकाशवाणीच्या विविध प्रादेशिक वृत्तविभागांच्या सोशल मीडिया आणि युट्युबवरही हा कार्यक्रम ऐकता येईल. तेव्हा ऐकायला विसरू नका, सोमवार १ एप्रिलपासून. संध्याकाळी सव्वा ७ ते साडे ७ वाजेदरम्यान दररोज ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’.

<><><><><><><>

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने आणखी ५ उमेदवारांची नावं आज जाहीर केली. यात कर्नाटकातल्या बेल्लारी मतदारसंघात ई.तुकाराम यांना, चामराजनगरमधे सुनील बोस यांना  तर चिक्कबल्लापूर मधे रक्षा रामय्या यांना उमेदवारी मिळाली आहे. राजस्थानात राजसमंद इथून डॉ दामोदर गुर्जर यांना तर भिलवाडा इथून डॉ. सी. पी जोशी यांना काँग्रेसनं मैदानात उतरवलं आहे. महाराष्ट्रात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री शिवराज पाटील यांच्या स्नुषा डॉ अर्चना पाटील चाकूरकर यांनी आज भाजपात प्रवेश केला.

दरम्यान, सरकारी यंत्रणांना हाताशी धरुन सत्ताधारी पक्ष विरोधी पक्षांना त्रास देत असल्याचा आरोप काँग्रेसनं केला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश आणि खजिनदार अजय माकन यांनी काल नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत सांगितलं की, काँगेसवर प्राप्ती फेरतपासणीसीठी नोटिसा बजावून काँग्रेसची सर्व खाती गोठवण्यात आली आहेत. यामुळे काँग्रेसला प्रचारासाठी पैसा खर्च करता येत नाहीये आणि त्यामुळे लोकशाहीत आवश्यक असलेली समान संधी विरोधी पक्षांना मिळत नाहिये.

<><><><><><><>

आम आदमी पार्टीचे नेते आणि दिल्लीचे माजी मंत्री सत्येंन्द्र जैन यांची चौकशी करण्यासाठी गृह मंत्रालयानं सीबीआयला मंजुरी दिली आहे. कथित गुन्हेगार सुकेश चंद्रशेखर याच्याकडून, दिल्ली मंत्रिमंडळात मंत्री असताना, सत्येंन्द्र जैन यांनी सुमारे दहा कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. दरम्यान, आम आदमी पार्टीचे दिल्लीचे परिवहन मंत्री कैलाश गेहलोत यांना कथित मद्य घोटाळा प्रकरणी सक्तवसुली संचलनालयानं समन्स जारी केलं आहे. आज त्यांना चौकशी साठी बोलावलं आहे.

**<><><><><><><>**

जेम अर्थात सरकारी ई मार्केटमध्ये चालू आर्थिक वर्षात ४ लाख कोटी रुपयांची विक्रमी खरेदी झाली आहे. ही रक्कम मागील वित्त वर्षाच्या तुलनेमध्ये दुप्पट असल्याची माहिती काल नवी दिल्लीमध्ये जेमचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. के. सिंह यांनी पत्रकारांना दिली. यामुळे जेम पोर्टलची डिजिटल क्षमता आणि कार्यक्षमतेविषयी विश्वास व्यक्त होतो असंही ते यावेळी म्हणाले. सरकारी खरेदीमध्ये दक्षता, पारदर्शकता आणि कोणत्याही अडथळ्याशिवाय कारभार होत असल्याचं यावरून निदर्शनास येत आहे. स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहित करण्यासाठी, व्होकल फॉर लोकल, एक जिल्हा एक उत्पादन, स्टार्टअपचा वापर करणं यासारख्या प्रयत्नांमुळे घरगुती उद्योग करणाऱ्यांना समान संधी उपलब्ध करून देणं आणि त्यांचा व्यवसाय वाढवण्याच्या संधी उपलब्ध करून देणं हा यामागचा उद्देश असल्याचं सिंह यांनी सांगितलं.

**<><><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनौ सुपर जायंट संघाची, पंजाब किंग्ज् संघाशी लढत होणार आहे. लखनौच्या अटलबिहारी वाजपेयी मैदानावर आज संध्याकाळी या सामन्याला सुरुवात होईल. दरम्यान, काल कोलकाता नाईट

रायडर्सनं बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी मैदानावर रॉयल चॅलेन्जर्स बंगळुरू संघाचा सात गडी राखून पराभव केला. कोलकाता नाईट रायडर्सनं यंदाच्या आयपील क्रिकेट स्पर्धेत आत्तापर्यंत दोन सामन्यांमध्ये विजय मिळवला तर रॉयल चॅलेन्जर्स बंगळुरूच्या संघानं तीन सामन्यांपैकी केवळ एकच सामना जिंकला आहे.

**<><><><><><><>**

माद्रीद स्पेन मास्टर्स खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत काल भारताच्या एन सिक्की रेड्डी आणि बी सुमीत रेड्डी या मिश्र जोडीने इंडोनेशियाच्या लिसा अयु कुसुमावती आणि रेहान कुशारजंतो या जोडीचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यांनी हा सामना २१-१४, ११-२१, १७-२१ अशा गुणांनी जिंकला. अंतिम सामन्यात स्थान निश्चित करण्यासाठी आता या भारतीय जोडीचा मुकाबला आज इंडोनेशियाच्या रिनोव रिवाल्डी आणि पिथा मेंटारी यांच्याशी होणार आहे. दरम्यान, अव्वल मानांकीत भारतीय खेळाडू पीव्ही सिंधू हिला महिला एकेरी सामन्यात काल थाईलंडच्या काटेथोंग हिच्याकडून २६-२४, १७-२१, २०-२२ असा पराभव स्वीकारावा लागला.

**//<><><><><><><>//**